# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष १ ले. अंक ५ वा. नवी मुंबई दिनांक १ ते ३० नोव्हेंबर २०११ पाने १६ किंमत २० रूपये

## महाभ्रष्ट पोलीस खाते ? खरंच किती खाते ?

### माहिती अधिकार वापरा,पोलीसाच्या कामाची तपासणी करा



## रेडिमेड प्रश्नावली



सरकारी विभागांना काय व कोणती माहिती मागावी ?

## लोडशोडींगचा अंधार आणि वीज ग्राहकांचे अधिकार व हक्क

## बिघडलेला भारत दुरूस्त करेल स्वराज्याची गुरूकिल्ली !



## पॉवरफुल गल्ली,कामापूरती दिल्ली

माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक
**नागरिक अधिकार**

*संपादक*
सुभाष बसवेकर
*कार्यकारी संपादक*
गणेश काजळे पाटील
*संपादक मंडळ*
*जिल्हा प्रतिनिधी*
राजेश बने (मुंबई)
कु.शीतल कापूरे (नवी मुंबई )
आप्पासाहेब मगर (ठाणे)
भगवान वाहूळे (पुणे )
प्रीतम यादव ( सातारा)
देवीदास चौथमल (औरंगाबाद)

अंक दर महिन्याच्या १ तारखेला प्रसिद्ध होतो.अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.
सर्व वादविवाद (पनवेल,नवी मुंबई न्यायालय कार्यकक्षेत)

पत्ता : **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-९८, सेक्टर -१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो ९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com

नागरिक अधिकार या मासिकांसाठी स्वराज बहुउद्देशिय संस्था,खारघर यांच्याकडून छपाई व वितरणांसाठी अर्थसाहय मिळाले आहे.

# दिवाळीच्या शुभेच्छा

## इडापिडा टळो ! बळीचं राज येवो !!

नागरिक अधिकार मासिकाचा पुन्हा एक नवा अंक आपल्या समोर सादर करीत आहोत. एककडे आम्ही दिवाळीचे प्रकाशपर्व साजरे करीत आहोत तर दुसरीकडे लोडशेडींगमुळे महाराष्ट्र शासनाने अंधारपर्व सुरू केले आहे.एकेकाळी विजेच्या बाबतीत स्वंयपूर्ण असणारे आमचे राज्य आज राज्यकर्त्यांनी भिकेला लावले आहे.महाराष्ट्रात सुमारे विस वर्षापासून वीज निर्मितीचे नवीन प्रकल्प करण्यासाठी एक नवा पैसा सुद्धा खर्च केला गेला नाही.ही आमच्यासाठी शरमेची बाब असून आज हजारो गांवात वीज नसल्यामुळे अंधारात दिवाळी साजरी होत आहे.

आज जरी राज्यकर्त्यांनी समोर अंधार वाढून ठेवला असला तरी प्रत्येकांनी आपल्या हृदयातील आशा व आकांक्षांची पणती कायम तेवत ठेवली तर आपली दिवाळी नक्की च प्रकाशमय व आनंदमय होणार यात शंकाच नाही.इडा पीडा टळू दे आणि बळीचं राज्य येवू दे ! असा आशवाद व्यक्त करून भाऊबीजेला बहिण भावाला ओवाळीते.ते बळीचं राज्य म्हणजे सामान्य माणसांला निर्णय प्रक्रियेत सामावून घेणारं राज्य आता लवकरच देशातील गावागावात सुरू होईल.गावाचे सगळे ग्रामस्थ ग्रामसभेत गावाच्या कारभाराविषयी निर्णय घेतील असे कायदे दृष्टीक्षेपात येत आहेत.दिल्लीत बसलेले मंत्रीमंडळातील २० ते २५ लोक पाच लाख खेडयांचा विशाल भारत व्यवस्थीत चालवूच शकत नाहीत.हे सिद्ध झाले आहे.दिवाळीच्या निमित्ताने सर्वांना प्रकाशमय पुन्हा शुभेच्छा !

इतरांना आनंद देत देत आपण खरा आनंद मिळवणे म्हणजे खरे जगणे होय.

# महाभ्रष्ट पोलीस खाते ? खरंच किती खाते ?

"सद्रक्षणाय,खल निग्रहणाय" हे पोलीसांचं बोधवाक्य पोलीसांची भूमिका सांगून जातं. असं सगळं असलं तरी पोलीस खरंच आपल्या बोधवाक्यला अनुसरूण वागतात का ? याचा सामाजिक कानोसा घेतला तर आपल्याला फारचं धक्कादायक निष्कर्ष पाहायला मिळतात. चारित्र्य प्रमाणपत्र घ्यायचंय, पासपोर्ट व्हेरिफिकेशन हवयं, किंवा अगदी स्पीकर परवाना घ्यायचा असो. की ट्राफिक पोलीसांनी गाडी पकडलेली असो. आपली बाजू किती ही सुरक्षित असो. कायद्याचा कीस पाडून काही तरी त्रूटी काढतीलच. मग पोलीसांना लाच म्हणून पैसे दिल्या शिवाय सूटका नाही. सामान्य माणसांना नाडणारा सर्वाधिक भ्रष्टाचार पोलीस स्टेशनमध्ये होतो. गुन्हा नोंदवून घेण्यासाठी, न घेण्यासाठी, आरोपींना अटक करण्यासाठी न करण्यासाठी, गुन्हेगारांना अभय देण्यासाठी, कोठडीत बडदास्त ठेवण्यासाठी, शस्त्र परवाना मिळवण्यासाठी प्रत्येक स्तरावर १०० रूपयांपासून ते हजारो लाखो रूपयांपर्यत चे रेट ठरलेले दिसतात.

पोलीसस्टेशनच्या कार्यक्षेत्रात किती चोऱ्या झाल्या ? किती लटूमारीच्या घटना घडल्या? किती दूचाकी व चारचाकी वाहने चोरी झाली ? अपहरण, बलात्कार अशा घटना किती घडल्या यावर पोलीसांच्या कार्यक्षमतेविषयी प्रश्नचिन्ह उमटत असते. तर यातील किती गुन्हे उघड झाले ? किती मुद्द्देमाल परत मिळाला. यावर पोलीसांची कार्यक्षमता ठरत असते. माहिती अधिकारात घडलेले गुन्हे व उघडकीस आलेले गुन्हे अशी माहिती मागवून आपण पोलीसांच्या कामाचे मूल्यमापन किंवा ऑडीट केल्यास पोलीसांसाठी व समाजासाठी ते उपयुक्त होईल.

पोलीस खाते आणि नागरिकांची सनद

१)प्रत्येक नागरिकांना आपली तक्रार लेखी किंवा तोंडी देण्याचा अधिकार आहे.

२) नोंदवलेल्या प्रथम खबरी रिपोट ची एक प्रत विनामूल्य मिळविण्याचा अधिकार आहे.

३) गुन्हयाचे स्वरूप अदखलपात्र गुन्हा असे असेल तर पोलीस फक्त गुन्हा नोंदवून घेतात. स्वत:हून तपास सुरू करू शकत नाहीत. त्यासाठी कोर्टाचा हुकूम आणावा लागतो.

४) विनंती करूनही गुन्हा नोंदवला जात नसल्यास, आपल्या विभगातील वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे विनाविलंब तक्रार नोदंवावी.

५)आरोपीला अटक केल्याबरोबर अटक करण्याचे कारण तसेच त्याच्यावर लावलेल्या कलमांची माहिती आरोपीला मिळणे हा आरोपीचा हक्क आहे.

६) आरोपीला अटक केल्यानंतर ताबडतोब त्याच्या अटकेची माहिती आरोपीच्या विनंतीवरून जवळच्या नातेवाईकांना किंवा मित्रांना कळविणे ही पोलीसांची जबाबदारी आहे. तसेच त्यांची नोंद पोलीस डायरीत करणे आवश्यक आहे.

७) पोलीस कस्टडीतील आरोपीचे मेडीकल चेकअप करून त्यांच्या अंगावरील नव्या व जून्या जखमांची नोंद डायरीत होणे आवश्यक आहे.

८)आरोपीलचा वकीलांना पोलीस कोठडीतील आरोपीला भेटण्यांची परवानगी असते.

९)आरोपीला अटक केल्याची माहिती जिल्हा पोलीस नियंत्रण कक्षाला व राज्य पोलीस संचालक कार्यालयास कळविणे आवश्यक असते.

१०) आरोपीला अटक केल्यापासून २४ तासाच्या आत कोर्टात जजसमोर उभे करणे पोलीसांवर बंधनकारक असते.

११) अंगझडती करताना, तपास करताना, छापा मारताना किंवा वस्तू जप्त केल्याचा पंचनामा करताना तपास अधिकाऱ्याने स्वत:च्या नावाची नेमप्लेट व हुद्दा ठळकपणे दिसेल असा गणवेशावर लावला पाहीजे. छापा घालताना वस्तू जप्त करताना दोन पंचच्या उपस्थितीतच पंचनाम केला पाहिजे. पंचनाम्यावर उपस्थित पंचाच्या सहया आवश्यक असतात. पंचनाम्याची एक प्रत संबधीत व्यक्तीला देणे आवश्यक आहे. महिला आरोपीची अंगझडती घेण्यासाठी महिला पोलीसांनी किंवा उपलब्ध महिलाकरवीच घेणे बंधनकारक आहे.

( पान ९ वर )

# माहिती अधिकार कार्यकर्त्यांनो या नमूना अर्जाचा आधार घ्या आणि आपल्या भागातील गुन्हेगारी विषयक महितीचा ताळेबंद मांडा

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

सहाय्यक जनमाहिती अधिकारी / जनमाहिती आधिकारी.

सहाय्यक पोलिस अधिक्षक कार्यालय/वरिष्ठ पोलीस निरिक्षक

पोलीस स्टेशन ----------------

१) अर्जदाराचे पूर्ण नाव : -----------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता : -----------------------------------------------

३) माहितीचा विषय ------------- पोलीस स्टेशनमधून गुन्हेविषयक व तपासविषयक माहिती मिळणे बाबत.

४) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी

१) पोलीस स्टेशनच्या हद्दीत सन २०१० ते ऑगष्ट २०११ अखेर पर्यंतच्या काळात चैन स्नॅचिंग (सोन्याची साखळी खेचून पळविणे ) च्या किती घटना घडल्या ? अशा प्रत्येक गुन्हयातील प्रत्येक फिर्यादीची नावे व पत्ते द्यावेत.या प्रत्येक गुन्हेगारी घटनेत किती ग्रॅम सोनेचे ऐवज पळवला गेला? अशा गुन्हयातील किती प्रकरणातील किती आरोपी पकडण्यात पोलीसांना यश आले ? अशा प्रत्येक गुन्हेगारी घटनेतील कोणकोणत्याफिर्यादीचा किती ग्रॅम सोने ऐवज गुन्हेगार आरोपीकडून परत हस्तगत करण्यात आला ? यातील किती व कोणत्या फिर्यादींना त्यांचा प्रत्येकी किती ऐवज परत दिला गेला ?

२) पोलीस स्टेशनच्या हद्दीत सन २०१० ते ऑगष्ट २०११ अखेर पर्यंतच्या काळात महिलांची दिशाभूल करून किंवा फसवणूक करून सोन्याचे दागीने पळवण्याच्या च्या किती घटना घडल्या ? अशा प्रत्येक गुन्हयातील प्रत्येक फिर्यादीची नावे व पत्ते द्यावेत .या प्रत्येक गुन्हेगारी घटनेत प्रत्येक फिर्यादीचा किती ग्रॅम सोनेचे ऐवज पळवला गेला? अशा गुन्हयातील किती प्रकरणातील किती आरोपी पकडण्यात पोलीसांना यश आले ? अशा प्रत्येक गुन्हेगारी घटनेतील कोणकोणत्या फिर्यादीचा किती ग्रॅम सोने ऐवज गुन्हेगार आरोपीकडून परत हस्तगत करण्यात आला ? यातील किती व कोणत्या फिर्यादींना त्यांचा प्रत्येकी किती ऐवज परत देण्यात आला ?

३) पोलीस स्टेशनच्या हद्दीत सन २०१० ते ऑगष्ट २०११ अखेर पर्यंतच्या काळात घरफोडी/चोरी / दरोडे अशा किती घटना घडल्या ? प्रत्येक वर्षाचा तपशील द्यावा.अशा प्रत्येक गुन्हयातील प्रत्येकफिर्यादीची नावे व पत्ते द्यावेत. या प्रत्येक गुन्हेगारी घटनेत प्रत्येक फिर्यादीचा किती रूपये किंमतीचा काय काय माल / ऐवज चोरीला गेला? अशा गुन्हयातील किती प्रकरणातील किती आरोपी पकडण्यात पोलीसांना यश आले ? अशा प्रत्येक गुन्हेगारी घटनेतील किती व काय माल / ऐवज गुन्हगार आरोपीकडून परत हस्तगत करण्यात आल ? यातील किती फिर्यादींना त्यांचा प्रत्येकी किती माल /परत देण्यात आला ?

४) पोलीस स्टेशनच्या हद्दीत सन २०१० ते ऑगष्ट २०११ अखेर पर्यंतच्या काळात सायकल/दुचाकी/ चारचाकी चोरी झाल्याच्या किती घटना घडल्या ?प्रत्येक वर्षाचा तपशील द्यावा.अशा प्रत्येक गुन्हयातील प्रत्येक फिर्यादीची नावे व पत्ते द्यावेत. या प्रत्येक गुन्हेगारी घटनेत किती रूपये किंमतीची कोणकोणती वाहने चोरीला गेली? अशा गुन्हयातील किती प्रकरणातील किती आरोपी पकडण्यात पोलीसांना यश आले ? अशा प्रत्येकगुन्हेगारी घटनेतील कोणत्या फिर्यादीची किती वाहने गुन्हेगार आरोपीकडून परत हस्तगत करण्यात आली? यातील किती व कोणकोणत्या फिर्यादींना त्यांची प्रत्येकी वाहने परत देण्यात आली ?

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : ----------------------------

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे /नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण :------------------

दिनांक : ---------------------

(नाव : ------------------)

Mo: ------------------

रोखठोक मत

# बिघडलेला भारत दुरूस्त करेल स्वराज्याची गुरूकिल्ली ! पॉवरफुल गल्ली, कामापूरती दिल्ली !!



तुमच्या गावातील शिक्षक सरकारी शाळेत नेहमीच उशीरा येतात तरीही तुम्ही त्यांना जाब विचारू शकत नाही. तुमच्या गावातील आरोग्य सेविका उपचार करण्यासाठी बऱ्याचवेळा जागेवर हजर नसते तुम्ही काहीच करू शकत नाही.तुमच्या गावातील गुरांचा सरकारी डॉक्टर गुरांवर मोफत उपचार करण्यास तयार नसतो.तुम्ही काहीच करू शकत नाही.तुमच्या गावातील तलाठी पैसे घेतल्या शिवाय सातबाराचा उतारा देत नाही.तुम्ही काहीच करू शकत नाही. तुम्ही भले दक्ष नागरिक असाल प्रत्येक निवडणूकीत तुम्ही चांगल्याच आमदार खासदारांना मतदान केले असले तरी गावात सरकारी पगार घेऊन काम करणारी ही मंडळी गावाला न जमूनता हवी तशी भ्रष्ट वागतात कारण त्यांना चूकीचे वागल्याबद्द्ल जाब विचारण्याचा अधिकार गावाला नसून मुंबई-दिल्ली बसलेल्या राज्यकर्त्यांना आहे. लोकसेवक म्हणून जबाबदारीने कार्य पार न पाडल्यास अशा ग्राम स्तरावरील लोकसेवकांना जाब विचारण्याचा अधिकार ग्राम व वार्ड सभेस मिळाला पाहिजे.गावाच्या विकासाचे नियोजन ग्रामसभेत ठरले पाहिजे.गावाचा विकासात निर्णय प्रक्रियेत ग्रामसभेच्या माध्यमातून सर्व नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे. प्रत्येक नागरिकांला देशाच्या,राज्याच्या व गावाच्या कारभारातील मी एक घटक आहे.व या कारभारात निर्णय घेण्यासाठी माझे म्हणणे आवश्यक आहे असे वाटले पाहिजे.तरच बिघडलेला भारत एक दिवस नक्की दुरूस्त होईल.ग्रामसभा ही देशातील सर्वांत मोठी संसद आहे.केवळ दिल्लीत बसलेले १५ ते २० लोक व मुंबईत बसलेले १५ ते २० लोक लाखो खेडयांच्या कारभाराबद्द्ल निर्णय घेतील हे आता या पुढे मान्य होणार नाही.दिल्ली आता कामापुरती ठेवा आणि गल्ली पॉवरफुल होईल असा जनस्वराजाचा कायदा येणे ही काळाची गरज आहे.

मा.अण्णा हजारे यांच्या पाठीशी देशातील सामान्य जनता करोडोच्या संख्येने उभी राहिली.त्यामुळे सत्ताधारी कॉंग्रेससह सर्वच राजकीय पक्षांचे धाबे दणाणले आहे.आता सशक्त लोकपाल कायदा आणल्याशिवाय सरकारसमोर गत्यंतरच उरले नाही.परतुं तरीही अनेक उचापती व कुरापती काढून काही लोक यात अडथळे आणण्याचा प्रयत्न करीत आहेत.अण्णा टीमवर होत असलेले हल्ले हे याचेच लक्षण आहे.जनलोकपाल कायद्यानंतर निवडणूक सुधारणा व राईट टू रिकॉलवर लोकसंघर्ष सुरू करण्याचे संकेत अण्णांनी दिले आहेत.परंतु याच बरोबर ग्रामसंभाना अधिक अधिकार देण्याचे व शहरामधून वार्डसभांना कायदेशीर मान्यता व अधिकार देणारे जनस्वराज बील यांची देशभर चर्चा होणे तसेच जनस्वराजाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सगळा देश ढवळून काढण्याची गरज आहे.

ग्रामसभा जर सशक्त व क्रियाशील असेल तर गावाचा किती कायापालट होते हे राळेगण सिद्द्धी, हिवरे बाजार तसेच मेंढालेखा सारख्या गावांनी दाखवून दिले आहे.आमच्या गावात आम्हीच सरकार हा नारा हा देशातील पाच लाख गावामधून गुंजला पाहिजे.

कौतूक मोठ्या आवाजात करावे, दोष कानात सांगावेत.

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना एक आवाहन

# नागरिक अधिकार

हा अंक आपणास आवडला का ? प्रत्येक महिन्याला नवनवीन फ्रेश आणि उत्तमोत्तम माहिती आपल्याला घरपोच यावी असे मनापासून वाटते ना ?तर मग आपण विस्वासाने बिनधास्तपणे नागरिक अधिकार परिवाराचे सदस्य बना.

## आपण या अंकाचे वर्गणीदार व्हा !

**वार्षिक : २४०रूपये. पंचवार्षिक : १००० रूपये आजीवन :५,०००रूपये**

आपले डी.डी./ चेक नागरिक अधिकार या नावाने काढून संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई.९६,सेक्टर -१२ खारघर, नवी मुंबई ४१०२१० या पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवावेत किंवा तुमच्या शहरातील जवळच्या स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून **20102640492** या नंबरच्या खात्यावर सुभाष बसवेकर (संपादक नागरिक अधिकार पनवेल शाखा) या नावाने पैसे भरू शकता.बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर नियमित अंक पाठवला जाईल.

---

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना सभासद होण्यासाठी आवाहन

जनजागृती ! संरक्षण ! ! संघर्ष ! ! !

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार व जागरूक नागरिकांकडून शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्देसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन करीत असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे राज्य व जिल्हा स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई-४१०२१० या पत्यावर पाठवावा.

दोन अपूर्ण माणसांना,एकमेकांना पूर्ण करण्याची जी विलक्षण तळमळ लागते, तीच प्रीती.

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१०

| | |
|---|---|
| सभासद क्रमांक | |
| आय.डी. कोड | |

## सभासद फार्म

फोटो

नाव : ------------------------------------------------

पत्ता :------------------------------------------------

------------------------------------------------

मोबाईल : | | | | | | | | | | |   | | | | | | | | | | |

शिक्षण : ---------------------- जन्मदिनांक | | | | | | | | |

व्यवसाय :--------------------- येणाऱ्या भाषा: -----------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: -------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : -------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचेपदाधिकारी म्हणून कार्य करण्यास इच्छूक आहात काय ?
असल्यास,कोणत्या स्तरावर :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा / पदाधिकारी म्हणून .

मी गंभीरपूर्वक व विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी सभासद फी मी २०० रूपये भरीत आहे. सभासद ओळखपत्र मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावे.मी सभासद झाल्यावर भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीन.

दिनांक : / / आपला विस्वासू

ठिकाण :

सही

सक्सेस स्टोरीज

## ८०० आरटीआय अर्ज टाकणारा रिक्षाचालक !



# भ्रष्ट व्यवस्थेविरोधात रामशंकर सरोज चा एल्गार !

रामशंकर अयोद्याप्रसाद सरोज हा मुंबईच्या धारावी मध्ये राहणारा रिक्षाचालक. रोज मेहनत करायची आणि स्वाभिमानाने राहायचे.हा सरोजचा जगण्याचा परिपाठ.२००३-०४ च्या आसपास मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सरोजची सोसायटी एक बिल्डरला एसआरए अंतर्गत विकासाकरीता दिली.गरीब झोपडपट्टी निवासी लोकांना बिल्डर चूना लावतोय असे दिसताच सरोजमधला स्वाभीमान कार्यकर्ता भ्रष्ट बिल्डरविरोधात पेटून उठला.




सरोजने म्हाडा आणि बिल्डरच्या विरोधात आपला आवाज बुलंद करण्यास सुरवात केली.बिल्डरच्या अनाधिकृत बांधकामाचे अनेक पुरावे देवून तसेच माहिती अधिकारा कायद्याचा वापर करून सरोज ने म्हाडा आणि अन्य सलग्न प्राधिकरणांना तसेच पोलीसाना बेकायदेशीर बाबीविरोधात कारवाई करण्यास भाग पाडले.सरकारी व्यवस्था केवळ कागदी घोडे नाचवते.प्रत्यक्षात भ्रष्ट मंडळीना पाठीशीच घालते हा अनुभव या काळात सरोजला आला.परंतु व्यवस्थेविरोधात लंबी लढाई लढायची त्यात मेलो तरी बेहत्तर परंतु जीवनात हार मानायची नाही.हाच सरोजच्या जगण्याचा मंत्र झाला होता.

एक साधा दहावी पास रिक्षा ड्रायव्हर रामशंकर सरोजने गेल्या सहा वर्षात म्हाडा,मुंबई महापालिका,मंत्रालय,पोलीस स्टेशन व अन्य सरकारी कार्यालयात ८०० हून अधिक माहितीच्या अधिकाराचे अर्ज करून भ्रष्ट अधिकाऱ्यांना उघडे करण्याचा चंग बांधला आहे.अनेक वेळा त्याला माहिती देण्याचे टाळण्यात आले.कारण माहिती दिली तर बडया अधिकाऱ्यांचे पितळ उघडे पडणार होते.माहिती मिळावी म्हणून सरोजने थेट राज्य माहिती आयुक्त कार्यालयापर्यंत अनेकवेळा अपिले केली.परंतु थातूर मातूर कारणे देवून सरोजला अनेक भ्रष्ट अधिकाऱ्यांनी कागदी घोडे नाचवून माहिती दिली नाही.

दरम्यान रामशंकर सरोजने माहिती अधिकाराचे अर्ज करून माहिती मागू नये म्हणून अनेक प्रलोभने दाखवण्यात आली.अनेक अधिकाऱ्यांनी त्याला नवी रिक्षा घेऊन देतो,परंतु हा पिच्छा सोड असे सांगितले.काही बिल्डरांनी तर दोन-दोन प्लॅट देण्याचे अमीष दाखवले.परंतु हा स्वाभीमानी माहिती अधिकार कार्यकर्ता अमीषाला बळी पडला नाही.भ्रष्टाचाऱ्याच्या काळा चेहरा उघडा पाडणे हे सरोज चे जीवनातील ध्येय बनले आहे.त्यामुळे त्याला कोणी खरेदी करू शकले नाही.

**सरोजचे उदाहरण हे माहिती अधिकार कार्यकत्यांसाठी एक उत्तम उदाहरण आहे.माहिती अधिकाराचा वापर करून प्रशासन स्वच्छ करण्यासाठी व दक्ष नागरिकांचा प्रशासनावर वचक राहण्यासाठी हजारो सरोज जन्माला येणे ही काळाची गरज आहे.**

\- राजेश बने, मुंबई.

सेवेचा एक हात प्रार्थनेसाठी जोडलेल्या दोन हातापेक्षा अधिक उपयुक्त आहे.

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाची २०१२ ची दिनदर्शिका प्रकाशित होणार


माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या वतीने सन २०१२ची दिनदर्शिका काढण्यात येणार आहे. ११X१७ इंची आकारातील १२ पानाच्या दिनदर्शिकेत माहितीचा अधिकार या विषयांची उपयुक्त माहिती असेल.तसेच तारखांच्या चौकटीत महत्वाचे सण,राष्ट्रीय दिन व थोर पुरूषांचे जन्मदिन तथा पुण्यतिथीची नोंद दिलेली असेल. दिनदर्शिकेच्या वरील भागावर माहिती अधिकार महासंघाच्या पदाधिकाऱ्यांचे नावे व फोटो असणार आहेत.तसेच प्रत्येक पानावरील खालच्या बाजूस ३X १० इंच जागेत जाहिराती प्रकाशीत केल्या जातील. ३X१० इंच जागेसाठी ५,००० रूपये, ३X५इंच जागेसाठी २५०० रू तसेच ३X२ जागेसाठी १००० असे जाहिरात दर आहेत. एका पानावर जास्तीत जास्त पाच जाहिराती या प्रमाणे एकूण साठ जाहिराती स्विकारल्या जातील.या जाहिराती दुकाने, आस्थापना, सामाजिक संस्था व व्यक्तीगत अशा घेता येतील.माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघांच्या कार्यकर्त्यांनी आपल्या तालुक्यातून जिल्हयातून किमान पाच जाहिराती त्याचा मजकूर व लोगो नोव्हेंबर महिन्याच्या ३० तारखेपर्यंत महासंघाच्या नवी मुंबईतील कार्यालयाकडे पाठवाव्यात. ही दिनदर्शिका महाराष्ट्रातील सुमारे २५ जिल्हयात वितरीत होणार असून माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे महाराष्ट्रभरातील पदाधिकारी यात आर्थिक योगदान देणार आहेत.दिनदर्शिकेची किंमत २० रूपये असणार असून किमान २५ दिनदर्शिकांचे ५०० रूपये या प्रमाणे अडव्हॉन्स पाठवणाऱ्या कार्यकर्त्यांना दिनदर्शिका पाठवली जाईल.पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अधिक माहिती साठी सुभाष बसवेकर संपादक नागरिक अधिकार यांना ९२२३५१६९२० या क्रमांकावर संपर्क साधावा.

---

# पोलीस खाते खरेच किती खाते ?

(पान ३ वरून)

## महाराष्ट्राच्या गृहमंत्रालयाने प्रकाशीत केलेल्या नागरिकांच्या सनद प्रमाणे खाली दिलेल्या प्रमाणे तुमच्या भागातील पोलीस अधिकार वेळ पाळतात का ?




पोलीस स्टेशनमध्ये साधारण परिस्थीतीत १ तासात तक्रार नोंदवलीच पाहिजे. एफआरआयची कॉपी दोन तासात दिलीच पाहिजे. जामीन पात्र गुन्हयात जामीनदारांची खात्री पटल्याबरोबर दीड तासात जामीन मंजूर केलाच पाहिजे.अटक झालेल्या व्यक्तीच्या वकील किंवा नातेवाईकांना पोलीस स्टेशनला आल्यापासून १५ मिनीटाच्या आत भेट घेण्याची अनुमती मिळालीच पाहिजे.फार्म अेअे आणि पंचनाम्याची प्रत फिस भरल्यांनतर ३० मिनीटात मिळालीच पाहिजे.अटक झाल्यानंतर १ ते ४ तासाच्या आत आरोपीचे मेडीकल चेकअप झालेच पाहिजे.चारित्र्य पडताळणी पूर्ण करणे १ महिना,शस्त्र परवाना मंजूर करणे किंवा नाकारणे ३ महिने. अशा वेळा जर आपल्या परिसरातील पोलीस अधिकारी पाळत नसतील तर त्यांना या नागरिकांच्या सनदेची आठवण जरूर करून द्या.

आईला अलंकारांनी शोभा येत नसते, तर ती प्रेमाने येत असते.

ओळख कायद्याची

## वीज कायदा २००३



# वीज ग्राहकांचे हक्क व अधिकार

वीज कायदा हा महावितरण टाटा रिलायन्स व सर्वच सार्वजनिक व खासगी वीज पूरवठा कंपन्यांना समान रूपात लागू आहे.वीज कायदा २००३ च्या तरतूदीनुसार म.रा.वि.मं च्या महाराष्ट्रातील सर्व विभागीय मुख्यालयात ग्राहक तक्रार निवारण मंच निर्माण करण्यात आले आहे.ग्राहकांच्या सर्व तक्रारीचे (वीज चोरी वगळता) निवारण करण्याची जबाबदारी या मंचावर सोपवण्यात आलेली आहे.ग्राहक तक्रार निवारण मंचा हा त्रिस्तरीय मंच आहे.मंचावरील एक सदस्य हा ग्राहक प्रतिनिधी असतो.तर एक वीज कंपनीचा प्रतिनिधी असतो.निवृत्त न्यायाधिश अथवा निवृत्त सरकारी वरीष्ठ हा या मंचाचा अध्यक्ष असतो.ग्राहकाला आपली वीज कंपनी संदर्भातील तक्रार या मंचासमोर मांडता येते.त्या करिता कोणतीही फीस आकारली जात नाही.दाखल झालेल्या तक्रारीवर दोन महिन्याच्या आत मंचाला आपला निर्णय द्यावा लागतो.हा निर्णय ग्राहक आणि वीज कंपनी या दोघांना बंधनकारक असतो.जर ग्राहक या निर्णयावर समाधानी नसेल तर त्याला राज्याच्या ओंबुड्समन कडे अपील करण्याची मुभा आहे.वीज कंपनीला मात्र या निर्णयाविरोधात कोणतेही अपील करता येत नाही.

मंचाचे कामकाज हे इतर कोणत्याही अर्धन्यायिक संस्थेप्रमाणे चालते.ग्राहक आणि वीज कंपनी दोघांची बाजू प्रथम ऐकूण घेतली जाते.व त्या नंतर मंच आपला निर्णय देतो.ग्राहकाला अथवा वीज कंपनीला मंचासमोर प्रतिपादन करण्यासाठी वकील नेमण्याची परवानगगी नाही.स्वत:ला मंचासमोर हजर राहणे शक्य नसल्यास आपल्या प्रतिनिधी मार्फत आपले म्हणणे मांडता येते.वीज क्षेत्रातील सेवांमध्ये सुधारणा होण्यासाठी ग्राहक तक्रार निवारण मंचाची स्थापना हे एक अत्यंत सकारात्मक पाऊल आहे.खरी गरज आहे या संस्थांचे स्वातंत्र्य या पुढे अबाधित राखण्याची आणि ग्राहकानीच या संस्थेला बळकटी देण्याची.

वीज कायदा २००३ वीज मंडळाने हलगर्जी केल्यास ग्राहक म्हणून आपण वीज मंडळाकडे खालीलप्रमाणे नुकसान भरपाई मागू शकतो.

विद्युत पुरवठा करणे :१) अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून अर्जदाराच्या जागेची तपासणी पूर्ण करण्याचा कालावधी : सात (७) दिवस (नगरे व शहरे ) जर सात दिवसात तपासणी नाही केली तर पुढच्या प्रत्येक आठवड्यास वीज मंडळाकडून रूपये १०० इतकी नुकसान भरपाई ग्राहकांना मिळू शकते.

२)अर्ज प्राप्त झाल्यापासून ग्राहकांनी किती खर्च

**पूर्वसूचना न देता अचानक वीज गेल्यास प्रत्येक ग्राहकांना महावितरण कडे नुकसान भरपाई मागण्याचा कायदेशीर अधिकार आहे.**

फ्यूज गेल्यास : चार(४) तास (नगरे व शहरे) या पेक्षा अधिक वेळ वीज आली नाही तर ग्राहक प्रत्येक तासाला ५० रूपये या प्रमाणे नुकसान भरपाई मागू शकतो. चौवीस (२४) तास ग्रामीण क्षेत्र या पेक्षा अधिक वेळ वीज आली नाही तर ग्राहक प्रत्येक तासाला ५० रूपये या प्रमाणे नुकसान भरपाई मागू शकतो.

ओव्हरहेड तारांत बिघाड झाल्यास सहा (६) तास (नगरे व शहरे) व २४ तास ग्रामीण भाग या पेक्षा अधिक वेळ वीज आली नाही तर ग्राहक प्रत्येक तासाला महावितरणच्या ग्राहकमंचाकडे तक्रार कररून प्रतितास५० रूपये या प्रमाणे नुकसान भरपाई मागू शकतो.

अकारण काळजी करणे म्हणजे न घेतलेल्या कर्जावर व्याज भरण्यासारखे आहे.

## ग्राहक सनद/ सेवा

परवानाधारक वीज कंपनीचा प्रतिनिधी आपल्या घरी मीटर रिंडींग किंवा अन्य कोणत्याही कामासंदर्भात आला असता त्याच्याकडे नामपट्टी आणि ओळख पत्र दाखविण्याची ग्राहकांनी मागणी करूनही तसे तो प्रतिनिधी उपलब्ध करून देऊ शकत नसल्यास प्रत्येक कसूर झाल्याच्या प्रसंगी ग्राहक वीज कंपनीकडे ५० रूपये दंड मागू शकतो.

मीटर रिडरने ग्राहकांच्या मीटरची प्रत्येक महिन्यातून एकदा नोंदणी केलीच पाहिजे (कृषी ग्राहक वगळता) जर मीटरची नोंद महिन्यात एकदा न घेतली तर पुढील एक महिन्याच्या भागात झालेल्या विलंबास १०० व पुढील प्रत्येक महिन्याच्या विलंबास २०० रूपये दंड ग्राहक वीज कंपनीकडे मागू शकतो.मागणी करूनही दुसरे देयक एक आठवडयास न दिल्यास पुढील प्रत्येक आठवडया वीज कंपनीकडे ग्राहक १०० रूपयाचा दंड मागू शकतो.

करावा लागेल हा तपशील वीज कंपनीने १५ दिवसाच्या आत ग्राहकाला कळवायलाच हवा. नाही कळवल्यास पुढील प्रत्येक आठवड्यास ग्राहक प्रतिआठवडा १०० रूपये नुकसान भरपाई मागू शकतो.

३) विद्युत पूरवठा मागणीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून जर १ महिन्याच्या कालावधीत जर योग्य मुदतीत वीज पूरवठा शुल्क भरूनही ग्राहकांस वीज पूरवठा जोडणी दिली नाही तर विलंबाच्या प्रत्येक आठवडयास वीज मडळाला रूपये १०० इतकी नुकसान भरपाई ग्राहक मागू शकतो.

खालील बाबीसंदर्भातही ग्राहकांला नुकसान भरपाई मिळवून घेण्याचा हक्क आहे

पुनर्जोडणी :

ज्या ग्राहकांचा वीजपूरवठा ६ महिन्यापेक्षा कमी काळासाठी तोडण्यात आला आहे.त्याच्या बाबतीत परवानाधारकाचे समाधान होईल इतकी सर्व रक्कम भरल्यापासून किंवा वाद असल्यास अधिनियमाच्या कलम ५६ च्या उपकलम (१) परंतुकानुसार निषेध नोंदवून तशी रक्कम भरल्यापासून चोवीस (२४) तास नगरे व शहरे रूपये १०० विलंबाच्या प्रत्येक आठवड्यास.

मिटर्स जळाल्यास ग्राहकांने लेखी तक्रार दाखल केल्याच्या दिनांकापासून चोवीस (२४)(तासात नगरे व शहरे )व ७ दिवस ग्रामीण भाग नवीन मिटर बसवून दिलेच पाहिजे.जर यात विलंब झाला तर पुढील प्रत्येक आठवडयासाठी १०० रूपये नुकसान भरपाई ग्राहक मागू शकतो.

# बेस्ट RTI कार्यकर्ता पुरस्कार -२०१२

आपण माहिती अधिकार कार्यकर्ते आहातच.महाराष्ट्रातील सर्वोत्तम कार्य केलेल्या आघाडीच्या २० कार्यकर्त्यांचा बेस्ट आरटीआय कार्यकर्ता पुरस्कार देवून गौरव केला जाणार आहे.सदर राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम फेब्रुवारी २०१२ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे.सदर कार्यक्रम स्वराज बहुउद्देशीय संस्था तसेच मुंबई कार्यरत अन्य संस्थांकडून प्रायोजित होणार आहे.महाराष्ट्राच्या सर्वदूर व सर्व विभागात माहिती अधिकार वापरून प्रसंगी प्रस्थापितांच्या धमक्या व मार खाऊन,प्राणांची बाजी लावून उत्तम कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची सार्थ सन्मान होणे ही समाजाची गरज आहे या भावनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.तरी कार्यकर्त्यांनी संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई-९६ सेक्टर -१२ खारघर नवी मुंबई येथे आपण वर्षभर मागीतलेली माहिती,उघड केलेली भ्रष्टाचारांची प्रकरणे, व सलग्न माहिती पाठवावी ही विनंती.

# रेडिमेड प्रश्नावली

## माहिती अधिकारात सर्व सरकारी विभागांना कशी ,काय व कोणती माहिती मागावी ?

## आपल्या भागातील पोलीस स्टेशन सहाय्यक पोलीस अधिक्षक तसेच अन्न व औषधी आयुक्त जिल्हा कार्यालय यांना माहिती मागा.

माहिती अधिकार कायद्याचा उपयोग करून आपणा अनेक छोटे छोटे सार्वजनिक प्रश्न व समस्या सोडवता येतात.या अंकात छापलेल्या सक्सेस स्टोरी हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. अंकामध्ये यावेळी पोलीस खात्याविषयीची माहिती कशी विचारावी याचे काही माहिती अधिकार नमुने दिले आहेत.पोलीस अधिकारी हे लोकसेवक आहेत ते काय व कसे काम करतात याची माहिती काढून ती सर्व समाजासमोर ठेवली तर पोलीस खात्यामध्ये मोठी पारदर्शकता येईल.हा विचार करूनच पोलीस खात्याविषयी प्रश्नावली दिली आहे याची आरटीआय च्या माध्यमातून थोडीसी देखरेख ठेवली तर मोठे सामाजिक काम तुमच्या हातून होऊ शकते.या अंकात पान नं १३,१४,वरील प्रश्नावली पाहव्यात.आता सणासुदीचे दिवस आले आहेत.दिवाळी मध्ये मिठाई मोठया प्रमाणात भेसळयुक्त पदार्थ वापररून बनवली जाते.जनतेने या वेळीअन्न व औषध आयुक्तांकडे तक्रारीच्या माध्यमातून दबाब आणून मिठाईत भेसळ होणार नाही म्हणून अन्न निरिक्षकांना अधिक सजग राहण्यास भाग पाडले पाहिजे.या संबधी चा नूमना अर्ज पान नं.१५ वर दिला आहे. माहिती अधिकारांचे नमुने दिले आहेत.हे नमुने केवळ पथदर्शक आहेत.त्यात अधिक अभ्यास करून किंवा त्या त्या विभागाच्या संकेतस्थळावर जाऊन अधिक माहिती घेऊन अधिक प्रभावी प्रश्नावली आपण बनवून निर्भयपणे अधिक खोचक माहिती मिळवा.खोचक हा शब्द या साठी वापरला आहे की त्याशिवाय हे प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी मंडळी जागी होणार नाहीत..अनेक कार्यकर्त्यांनी या सदर्भात नमुना प्रश्नावली प्रसिद्ध करण्याची विनंती केली होती.

.सामाजिक कार्यकर्त,आरटीआय कार्यकर्त्यांनी आपले माहिती अधिकार वापरताना आलेले अनुभव,आपल्या सक्सेस स्टोरीज् तसेच त्यांनी वापरलेले प्रभावी अर्जाचे नमूने, माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या कार्याचा परिचय, अशा प्रकारातील लेख व अनुभव लिहून **नागरिक अधिकार** कडे पाठवावेत योग्य ती प्रसिद्धी दिली जाईल. मासिक नागरिक अधिकार हे माहिती अधिकारांचा वापर करून प्रशासन पारदर्शक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे आपले हक्कांचे व्यासपीठ असणार आहे.आपल्या हक्काचे हे व्यासपीठ बळकट करण्यासाठी आपण नक्की सहकार्य कराल हा विस्वास आहे.

अंकूरीत होण्याआधी जमीनीत गाडून घ्यावे लागते.

# वाहनचोरी व त्यानंतरच्या कारवाईच्या माहितीसाठी आरटीआय चा उपयोग करा

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

## (जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

सहाय्यक जनमाहिती अधिकारी / जनमाहिती आधिकारी.

सहाय्यक पोलिस अधिक्षक कार्यालय/वरिष्ठ पोलीस निरिक्षक

पोलीस स्टेशन ----------------

१) अर्जदाराचे पूर्ण नाव : ------------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता : ------------------------------------------------

३) माहितीचा विषय -------पोलीस ठाणे यांच्या ताब्यात असणारी बेवारस वाहने ,कागदपत्रे सादर न झालेली वाहने तसेच गाडी चोरांकडून जप्त केलेली वाहने तसचे पोलीस ठाण्याच्या आसपास पडलेल्या परंतु पोलीसांच्या ताब्यात असणाऱ्या सर्व सर्व दुचाकी व चारचाकी वाहनांची माहिती मिळणेबाबत

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी

१) आपल्या पोलीस स्टेशन कार्यालयाच्या ताब्यात घेतलेली,जप्त केलेली, मूळ कागदपत्रे सादर होऊन न शकलेली, बेवारस मिळालेली, तसेच गाडीचोंराकडून पोलीसांनी ताब्यात घेतलेली एकूण किती दुचाकी व इतर वाहने किती आहेत ? या वाहनांची संख्या, आरटीओंनी दिलेले वाहन नंबर, प्रत्येक वाहनांचा इंजिन नंबर, चेसीज् नंबर वाहनांच्या प्रॉडक्शन कंपनीचे नाव अशी माहिती द्यावी.२) २००५ पासून ते २०१० पर्यंत दरवर्षी किती चोरीची वाहने आपल्या पोलीसांनी चोंराकडून पकडून आपल्या ताब्यात घेतली ? याचा प्रत्येक वर्षाची संख्या द्यावी.त्यातील किती वाहने मूळ मालकांना परत दिली ?याची संख्या द्यावी.

३) २००५ पासून ते २०१० पर्यंत दरवर्षी या पोलीस ठाण्यात किती वाहन चोरीच्या तक्रारी दाखल झाल्या प्रत्येक वर्षाची माहिती संख्या द्यावी.

४) या पोलीस ठाणे या कार्यालयाच्या ताब्यात पडून असणारी आणि मूळ कागदपत्रे सादर न होऊ शकलेली बोगस / बेकादेशीर पडून असणाऱ्या प्रत्येक वाहनांचे नंबर प्लेट, इंजिन नंबर,चेसीस नंबर प्रॉडक्शन कपंनीचा तपशील काढून या मुळ वाहनांच्या खऱ्या मालकांचा शोध सदर वाहतूक शाखेतून झाला काय ?यासंबंधी विभागीय परिवहन अधिकाऱ्यांशी ( आरटीओ ) वाहन क्रमांक, इंजिनव चेसीस क्रमांक असा संदर्भ देऊन पत्रव्यवहार झाला आहे काय ?नसल्यास का झाला नाही ?

६) या पोलीस ठाणे या कार्यालयाच्या असणाऱ्या बेकायदेशीर व बोगस रित्या पडून असणाऱ्या व मुळ मालकांचा ठाव ठिकाणा लागत नसल्याने अशा वाहनांचा किती ठराविक कालावधीनंतर लिलाव करता येतो ? लिलावासाठी कोणत्या सक्षम अधिकाऱ्यांची परवानगी असणे आवश्यक आहे ? लिलावासाठी पनवेल शहर पोलीस शाखेतर्फे काही प्रयत्न किंवा वरिष्ठांशी पत्रव्यवहार झाला आहे काय ? या पत्रव्यवहरांच्या सत्यप्रती उपलब्ध करून द्याव्यात. २००५ नंतर किती वेळेस लिलाव झाला ? किती वाहने विक्री केली गेली ? त्यातून किती रक्कम शासनाकडे जमा करण्यात आली ? २००५ नंतर लिलाव झाला नसल्यास असा प्रयत्न का झाला नाही ? लिलाव न करून शासनाचा महसूल बूडवण्यास कोणकोणते तत्कालीन अधिकारी जबाबदार ठरू शकतात?त्यांच्यावर काय करावाई होऊशकते आपल्या शाखेतील अधिकाऱ्यांवर वरीष्ठामार्फत अशी कारवाई झालेली आहे काय ?

७) या पोलीसांनी जप्त केलेली वाहने ,ताब्यात घेतलेली वाहने पोलीस स्टेशनच्या आवारात ठेवल्यांनतर या वाहनांचे स्पेअर पार्ट चोरीला गेले आहेत काय ? गेले असतील तर तशी तपशीलवार नोंद पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली आहे काय ? कोणत्या वाहनांचे कोणकोणते सूट्टे भाग चोरीला गेले आहेत ?

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : ----------------------------

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे /नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण :------------------

दिनांक : ---------------------

(नाव : ------------------)

**Mo: ------------------**

ज्यांना जास्त गोष्टींची हाव असते त्यांना प्रत्येक गोष्टींची कमतरता असते.

# चारित्र्य प्रमाणपत्रांची तपासणी करण्यासाठी अर्जाचा नमूना

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
सहाय्यक जनमाहिती अधिकारी / जनमाहिती आधिकारी.
सहाय्यक पोलिस अधिक्षक कार्यालय/वरिष्ठ पोलीस निरिक्षक
पोलीस स्टेशन ----------------

१) अर्जदाराचे पूर्ण नाव : ----------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता : ---------------------------------------------

३) माहितीचा विषय आपल्या पोलीस स्टेशनमधून विविध प्रकारच्या चारित्र्य व अन्य तपासणी अहवालाची माहिती मिळणेबाबत.

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (सन २०११ आज अखेर तारखेपर्यत)

१) सन २०११ मध्ये आज अखेर तारखेपर्यंत आपल्या पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील किती व्यक्तींचे चारित्र्य तपासणीचे अहवाल तपासले गेले ?आपल्या कार्यालयात वरिष्ठ कार्यालयाकडून किंवा अर्जदाराकडून चारित्र्य तपासणीसाठी आलेल्या अर्जांची संख्या द्यावी.किती अर्जदारांना चारित्र्य तपासणी अर्ज नाकारले गेले ? किती अर्जदारांचे अर्ज स्विकारले गेले ? अशा व्यक्तीची नावे व पत्ते असा तपशील द्यावा. त्यांनी कोणकोणती कागदपत्रे जोडली अशा कागदपत्रांचे निरिक्षण करण्यासाठी व्यवस्था करावी. निवडक कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्याची व्यवस्था करावी

२) पासपोर्ट मिळावा म्हणून किती व्यक्तीची चारित्र्य पडताळणी करण्यात आली ? नावावर गुन्हे नोंद नसल्याचे किती जणांना चारित्र्य प्रमाणपत्र दिले गेले ? गुन्हे नोंद असणारे प्रमाणपत्र किती अर्जदारांना दिले गेले अशा व्यक्तीची नावे व पत्ते द्यावेत.त्यांनी कोणकोणती कागदपत्रे जोडली अशा कागदपत्रांचे निरिक्षण करण्यासाठी व्यवस्था करावी. निवडक कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्याची व्यवस्था करावी

३) रिक्षा किंवा बस चालक बिल्ला मिळावा म्हणून आरटीओकडून आलेल्या शिफारशी नुसार किती व्यक्तीची चारित्र्य पडताळणी करण्यात आली ? नावावर गुन्हे नोंद नसल्याचे किती जणांना चारित्र्य प्रमाणपत्र दिले गेले ? गुन्हे नोंद असणारे प्रमाणपत्र किती अर्जदारांना दिले गेले अशा व्यक्तीची नावे व पत्ते द्यावेत. त्यांनी कोणकोणती कागदपत्रे जोडली अशा कागदपत्रांचे निरिक्षण करण्यासाठी व्यवस्था करावी. निवडक कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्याची व्यवस्था करावी

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : ----------------------------

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे /नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण :------------------

दिनांक : ---------------------

(नाव : ------------------)

**Mo: ------------------**

प्रेमाची भाषा अशी आहे की जी बहिऱ्याला ऐकू येते,आंधळ्याला जाणवते व मुक्याला समजू शकते.

# मिठाई व अन्नपदार्थ विक्रीची माहिती विचारण्यासाठी अर्जाचा नमूना

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
## (जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
सहाय्यक जनमाहिती अधिकारी / जनमाहिती आधिकारी.
अन्न व औषध निरिक्षक आयुक्त कार्यालय,
जिल्हा----------------

१) अर्जदाराचे पूर्ण नाव : ------------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता : -----------------------------------------------

३) माहितीचा विषय : अन्न व भेसळ विषय आपल्या कार्यालयातील अधिकारी -कर्मचाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीचीमाहिती मिळणेबाबत

४) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (तपशीलप्रमाणे)

१)आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या किती मिठाई -निर्मीती व विक्री करणाऱ्या दुकानदारांची २०१० व २०११ आज तारखेपर्यंत तपासणी केली. किती दुकानात अनियमतता आढळली ? कारवाई केलेल्या दुकानदारांची यादी द्यावी. भेसळयुक्त खवा व प्रतिबंधीत रंग वापरून मिठाई बनविण्याऱ्या दुकानदारांविरोधात केलेल्या कारवाईचा तपशील द्यावा.

३)आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात किती हॉटेल व खाद्यपदार्थ निर्मिती व विक्री करणाऱ्या व्यवसायीकांनी परवाने घेतले आहेत ? एकूण संख्या द्यावी. या सर्व परनावधारक दुकानदारांची तपासणी वर्षातून किमान किती वेळा होते. अन्न निरिक्षकांनी केलेल्या कारवाईचे व तपासणीचे अहवाल द्यावेत.

५) आपलया कार्यालच्या कार्यक्षेत्रात ठोक गुटखा विकणारे किती व्यावसायिक आहेत. गुटख्यामध्ये मॅग्नेशियम कॉर्बेनेट वापर करणे बेकायदेशीर असतानाही असा गुटखा रायगड जिल्हयात विकला जातो काय? अशाकिती गुटखा निर्माते व विक्रेत्याविरूद्ध केव्हा आणि काय कारवाई करण्यात आली ?

६) आपल्या कार्यालयातील अन्न निरिक्षक व औषघ निरिक्षक यांची संख्या किती ? अन्न निरिक्षकांनी प्रत्येक महिन्यात किती अन्न नमूने तपासणे बंधनकारक आहे ?किती आस्थापनांना भेटी देणे बंधनकारक आहे.सन २०१० या वर्षात व २०११ मध्ये आज अखेर तारखेपर्यंत आपल्या कार्यालयातील अन्न व औषध निरिक्षकांनी किती भेटी दिल्या यात किती व्यावसायिक दोंषी आाढळले यांची माहिती द्यावी तसेच अन्न व औषध निरिक्षकांचे नावे पत्ते आणि कामाचे ठिकाणी याचा तपशील द्यावा.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : ----------------------------

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे /नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण :------------------

दिनांक : ---------------------- (नाव : ------------------)


Mo: ------------------

शेवटचे पान ..

# प्रेरणा

## जीवनाला ऊर्जा देणार इंधन !

सामाजिक कार्यकर्त्यांनी सामाजिक दृष्टीकोनातून काम करायचे म्हणजे नेमके काय करायचे?असा प्रश्न नेहमी उपस्थित होतो.असा प्रश्न पडलाच तर तो कसा सोडवायचा याचा एक तावीत मी तुमच्या हाती देतो.तुम्ही फक्त एकच करा. तुमच्या आसपास असणारा सर्वात दु:खी,दुबळा,परिस्थितीने गांजलेला माणूस शोधा,त्या माणसाच्या चेह-यावर तुमच्या काही करण्याने जर थोडेसे हसू उमटणार असेलतर तुम्ही जे करता ते सर्वांत श्रेष्ठ सामाजिक कार्य होय. म.गांधी



प्रति,

BOOK-POST

पाठविणार

पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-१६, सेक्टर-१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो ९२२३५९६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले.
MAHMAR39311/13/1/2011TC